पुणे महानगरपालिका

मालमत्ता व व्यवस्थापन विभाग

---

सालाबादप्रमाणे पुणे शहरात साजरा होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव करिता पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतीमध्ये क्षेत्रीय कार्यालय निहाय श्री गणेशमूर्ती विक्री गाळयांना तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देण्याच्या कार्यपद्धतीबाबत

## जाहीर आवाहन

सालाबादप्रमाणे यावर्षी साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांना व मंडळांना श्री गणेशमूर्ती विकत घेण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत श्री गणेशमूर्तीचे गाळे उभारण्यास रस्ता व पदपथावर परवानगी देण्यात येणार नसून, पुणे महानगरपालिकेच्या मोकळया/बाधीव जागांवर, मैदान, पटांगणे इ. जागांवर श्री गणेशमूर्ती विक्री करणे करिता परवानगी देण्यात येणार आहे. त्यानुसार या वर्षी श्री गणेशमूर्ती विक्री करणेसाठी सर्व श्री गणेशमूर्ती विक्रेत्यांना आवाहन करण्यात येत आहे.

ऑफलाईन पद्धतीने अग्रक्रमानुसार येणाऱ्यास प्राधान्य अशा पद्धतीने कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच या बाबतची सर्व कार्यपद्धती मनपा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने २०२५ या वर्षासाठी पुणे महानगरपालिका हद्दीत क्षेत्रीय कार्यालय निहाय १५' x १०' मापाचे गणपती गाळे विक्रीसाठी एकूण २५ जागा निश्चीत केल्या आहेत. त्याची यादी पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. श्री गणेशमूर्ती स्टॉल उभारणेची मुदत दि. २१/०८/२०२५ ते दि. ३०/०८/२०२५ अशी राहील. श्री गणेशमूर्ती गाळे विक्री बाबतची कार्यपद्धती पुणे मनपाच्या EOI या शिर्षाखाली प्रसिद्ध केलेली आहे.

## श्री गणेशमूर्ती गाळे विक्री बाबतची कार्यपद्धती

१. पुणे मनपा मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत भाडे कराराने जागा उपलब्ध करून देण्यात येणार असून गणेशमूर्ती विक्रीसाठी आवश्यक पोलीस परवानगी व इतर सर्व कायदेशीर परवानग्या घेण्याची व त्याप्रमाणे पुर्तता करण्याची जबाबदारी संबधित स्टॉलधारकाची राहील.

२. नमुना 'अ ' नुसार अर्ज भरून ऑफलाईनद्वारे सादर करावे.

३. अर्जासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, संपर्क क्रमांक, बँक पासबुकची झेरॉक्स स्कॅन करून जोडावे.

४. अनामत र.रु.१००००/- पुणे मनपाच्या अकाऊंटवर ऑफलाईन पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयात जमा करावे.

५. अर्जाच्या छाननी नंतर पात्र गाळेधारकांना १० दिवसांचे विहित भाडे पुणे मनपाच्या अकाऊंटवर ऑफलाईन पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयात जमा करावे.

६. पुणे मनपा कडून फक्त मोकळी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. स्टॉलचे तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम पात्र गाळेधारकांना स्वत: स्वखर्चाने करावयाचे आहे.

७. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये सर्व बाबींचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. मे.महाराष्ट्र शासनाकडील वेळोवेळी जाहीर केलेले आदेश बंधनकारक राहतील.

९. गणेश मूर्ती विक्रीबाबत मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करणे विक्रेत्यांवर बंधनकारक राहील.

१०. श्री गणेश मूर्तीची सुरक्षितता आणि आवश्यक दक्षता घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विक्रेत्यावर राहील.

११. गणेश मूर्ती विक्रीची वेळ मे.शासनाने व पुणे महापालिकेने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार असेल.

१२. नागरिकांना मूर्ती घेण्यासाठी सुरक्षित अंतर ठेवणेकरीता स्टॉल धारकांनी बांबूचे रेलिग, बॅरेकेटींग करणे आवश्यक राहील.

१३. अग्निशमन विभाग यांचेकडील अटी शर्तीची पूर्तता करणेकरीता नजीकअसलेल्या अग्निशमन केंद्र प्रमुखास जागा दाखवून त्यांचे सूचनेनुसार अग्निशमन यंत्रणा बसविण्यात येईल.अशा ठिकाणांवर कोणताही अपघात.हानी व दुखापत झाल्यास तसेच शेजारील इमारतीस अगर मालमत्तेस धोका पोहोचल्यास त्याची सर्व जबाबदारी गाळेधारकांची राहील.याबाबत पुणे मनपास कोणतीही तोषीस असणार नाही.

१४. गाळे उभारण्यात आलेल्या परिसराची स्वच्छता करणेची / राखणेची जबाबदारी सर्व गाळेधारकांची राहील. संबंधित आरोग्य निरीक्षकास अस्वच्छता आढळल्यास दंडात्मक कारवाई करूनअनामत रकमेमधून सदर दंडाची रक्कम.वजा करून घेण्यात येईल.

१५. स्टॉल विक्रीची मुदत संपल्यानंतर 3 दिवसांचे आंत स्वखर्चाने सदरच्या तात्पुरत्या स्वरूपातील गाळ्यांचे बांधकाम जागेवरून ताबडतोब हटवून जागा स्वच्छ करून रिकामी करून द्यावी लागेल. तसेच सदरच्या जागेचे कोणतेही नुकसान झालेले नाही याची खात्री गाळेधारकाने करून देणे आवश्यक राहील.

१६. या उत्सवादरम्यान विक्री झाली नाही अशा गणेश मूर्तींच्या संदर्भात योग्य त्या पद्धतीने विक्रीच्या ठिकाणावरून विक्रेत्यांच्या सोयीच्या ठिकाणी काळजीपूर्वक घेऊन जाण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विक्रेत्याची राहील.

१७. परवानगी दिलेल्या जागेची पुणे महानगरपालिकेस जरुरी भासल्यास अथवा त्या जागेबाबत वाद विवाद निर्माण झाल्यास सदर देण्यात आलेली अधिकृत परवानगी २४ तासाची पूर्वसूचना देऊन रद्द करण्याचा महापालिकेस हक्क राहील.

6.8.24

(वसुधरा बारवे)

**उप आयुक्त**

मालमत्ता व व्यवस्थापन

पुणे महानगरपालिका

# गणेशमूर्ती विक्रीकरिता मोकळी जागा

## नमुना 'अ' प्रमाणपत्र

मी अर्जदार, ------------------------------------------------------------------ प्रमाणित करतो/करते की,

१. पुणे मनपा मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत भाडे कराराने जागा उपलब्ध करून देण्यात येणार असून गणेशमूर्ती विक्रीसाठी आवश्यक पोलीस परवानगी व इतर सर्व कायदेशीर परवानग्या घेण्याची व त्याप्रमाणे पुर्तता करण्याची जबाबदारी माझी राहील.

२. पुणे मनपाच्या संकेत स्थळावरील लिंक द्वारे प्राप्त नमुना 'अ ' नुसार अर्ज भरून ऑफलाईन पद्धतीने सादर केलेला आहे.

३. अर्जासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, संपर्क क्रमांक, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत जोडण्यात आली आहे.

४. अनामत र.रु.१००००/- पुणे मनपाच्या अकाऊंटवर ऑफलाईन पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयात जमा करण्यात आले आहे.

५. अर्जाच्या छाननी नंतर पात्रतेनुसार १० दिवसांचे विहित भाडे पुणे मनपाच्या अकाऊंटवर ऑफलाईन पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयात जमा करण्यात येईल.

६. पुणे मनपा कडून फक्त मोकळी जागा उपलब्ध करून दिल्यानंतर स्टॉलचे तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम मी स्वत: स्वखर्चाने करणार आहे.

७. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये सर्व बाबींचे पालन करणे माझेवर बंधनकारक राहील.

८. मे.महाराष्ट्र शासनाकडील वेळोवेळी जाहीर केलेले आदेश माझेवर बंधनकारक राहतील.

९. गणेश मूर्ती विक्रीबाबत मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करणे माझ्यावर बंधनकारक राहील.

१०. श्री गणेश मूर्तीची सुरक्षितता आणि आवश्यक दक्षता घेण्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

११. गणेश मूर्ती विक्रीची वेळ सकाळी ९.०० ते सायंकाळी ९.०० पर्यंत आहे, त्याचे पालन करील.

१२. नागरिकांना मूर्ती घेण्यासाठी सुरक्षित अंतर ठेवणेकरीता बांबूचे रेलिंग, बॅरेकेटींग आवश्यकतेनुसार करील.

१३. अग्निशमन विभाग यांचेकडील अटी शर्तीची पूर्तता करणेकरीता नजीक असलेल्या अग्निशमन केंद्र प्रमुखास जागा दाखवून त्यांचे सूचनेनुसार अग्निशमन यंत्रणा बसविण्यात येईल.अशा ठिकाणांवर कोणताही अपघात,हानी व दुखापत झाल्यास तसेच शेजारील इमारतीस अगर मालमत्तेस धोका पोहोचल्यास त्याची सर्व जबाबदारी माझी राहील. याबाबत पुणे मनपास कोणतीही तोषीस लागू देणार नाही.

१४. गाळे उभारण्यात आलेल्या परिसराची स्वच्छता करणेची / राखणेची जबाबदारी सर्वस्वी माझी राहील. संबंधित आरोग्य निरीक्षकास अस्वच्छता आढळल्यास दंडात्मक कारवाई करून अनामत रकमेमधून सदर दंडाची रक्कम वजा करून घेण्यात येईल, याची मला माहिती मिळाली आहे.

१५. स्टॉल विक्रीची मुदत संपल्यानंतर 3 दिवसांचे आंत स्वखर्चाने सदरच्या तात्पुरत्या स्वरूपातील गाळयांचे बांधकाम जागेवरून ताबडतोब हटवून जागा स्वच्छ करून रिकामी करून देईल. तसेच सदरच्या जागेचे कोणतेही नुकसान झालेले नाही याची मी खात्री देतो.

१६. या उत्सवादरम्यान विक्री झाली नाही अशा गणेश मूर्तींच्या संदर्भात योग्य त्या पद्धतीने विक्रीच्या ठिकाणावरून विक्रेत्यांच्या सोयीच्या ठिकाणी काळजीपूर्वक घेऊन जाण्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

१७. परवानगी दिलेल्या जागेची पुणे महानगरपालिकेस जरुरी भासल्यास अथवा त्या जागेबाबत वाद विवाद निर्माण झाल्यास सदर देण्यात आलेली अधिकृत परवानगी २४ तासाची पूर्वसूचना देऊन रद्द करण्यात येईल, याची मला माहिती आहे.

गणेशमूर्ती विक्रीकरिता दिलेल्या तात्पुरत्या स्वरूपातील परवानगी मध्ये नमूद केलेल्या उपरोक्त सर्व अटी मी वाचल्या असून त्या मला संपूर्ण समजल्या असून मला मान्य आहेत.

(स्वाक्षरी)

अर्जदाराचे नाव :-

पत्ता :-

दिनांक :-

मो. क्र.